## प्रकरण दुसरे

## बळीराजा धरण - प्रदेश पार्श्वभूमी

## प्रकरण दुसरे

## बळीराजा धरण - प्रदेश पार्श्वभूमी

### 2·1 खानापूर तालुका :-

"बळीराजा स्मृती धरण" हे सन 1984 पासून अनेक कारणांनी देशभर चर्चिले जात आहे· प्रस्तुत प्रबंधिकेसाठी या धरणाचा अभ्यास करताना प्रथम धरण प्रदेश पार्श्वभूमीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे·

बळीराजा धरण हे पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्हयाच्या खानापूर तालुक्यातील बलवडी-तांदुळवाडी येथे दिमाखाने सध्या उभे आहे· येथील भौगोलिक पार्श्वभूमीतूनच बळीराजाचा जन्म झालेला आहे· खानापूर तालुका एका विविध भौगोलिक जडणघडणीचा आढळतो· या त्याच्या वैशिष्टयपूर्ण स्थानामुळे अनेक विकास प्रश्न निर्माण झालेले आहेत·

खानापूर तालुका हा दुष्काळसदृश तालुका म्हणून ओळखला जातो· पुरेसा पाऊस नसल्याने या तालुक्याला शेतीच्या पाण्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सातत्याने भेडसावीत आहे· या तालुक्यात नांदणी, अगरणी, येरळा या प्रमुख नद्या असून यापैकी येरळा ही सर्वात मोठी नदी आहे· 1970 पर्यंत येरळा ही बारमाही वाहणारी नदी म्हणून ओळखली जात होती· येरळा ही कृष्णेची उपनदी असल्यामुळे खानापूर तालुका हा एका अर्थाने कृष्णाखो-यातील तालुका आहे· सन 1972 च्या दुष्काळाने संपूर्ण महाराष्ट्रात भीषण परिस्थिती निर्माण झाली· या भीषण दुष्काळाने येरळेचे संपूर्ण सौंदर्यच नष्ट झाले· येरळा नदी पूर्णपणे कोरडी पडली· 1973 मध्ये महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या सुखटणकर समितीने महाराष्ट्रातील 14 जिल्हयातील 89 तालुक्यात दुष्काळ असल्याचे जाहीर केले· यामध्ये सांगली जिल्हयातील कवठेमहांकाळ, खानापूर, मिरज, जत, आटपाडी व तासगाव या सहा तालुक्यांचा समावेश होता· अशाप्रकारे हा तालुका अवर्षणप्रवणक्षेत्रातील तालुका म्हणून ओळखला जातो·

खानापूर तालुका हा कृष्णाखो-यातील सर्वात उंचीवरील तालुका होय. याची समुद्रसपाटीपासून उंची पश्चिम भागात 600 ते 900 मी. आणि पूर्वभागात 900 ते 1050 मी.आहे. या तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ 13077 चौ.कि.मी आहे.[1]

खानापूर तालुक्याची लोकसंख्या 1981 च्या शिरगणतेनुसार 2,18,035 इतकी असून यापैकी ग्रामीण लोकसंख्या 1,93,958 इतकी आहे. एकूण लोकसंख्येपैकी 1,11,000 स्त्रिया व 1,07,000 इतके पुरुष आहेत. इरिगेशन विभागाच्या अंदाजानुसार तालुक्यातील पावसाचे सरासरीप्रमाण 23 इंच इतके आहे. परंतु बलवडी येथील पर्जन्य-मापकाच्या नोंदीवरुन ‌(सध्या ते ऑफिस बंद आहे) हे प्रमाण 12 इंच एवढेच आहे.[2]

खानापूर तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र 1,32,602 हेक्टर असून त्यापैकी पिकाखालील क्षेत्र 87,493 हेक्टर इतके आहे. त्यापैकी खरीपक्षेत्र 69,900 हेक्टर तर रब्बी क्षेत्र 12,800 हेक्टर आहे. तसेच वनक्षेत्र 32,616 हेक्टर इतके आहे. तालुक्यात 78 पाझर तलाव असून, दहा लघुपाटबंधारे तलाव आहेत. तालुक्यात शेतविहिरींची संख्या 7,980 इतकी आहे. तालुक्यात 122 एकूण गावे असून 120 ग्रामपंचायती आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र 7 असून उपकेंद्रे 40 आहेत. आयुर्वेदिक दवाखाने 10 आहेत. तालुक्यात प्राथमिक शाळा 167 असून प्राथमिक शिक्षकांची एकूण संख्या 1106 इतकी आहे. तालुक्यात 5 महाविद्यालये, दोन अध्यापक महाविद्यालये आहेत. तालुक्यात प्रमुख शेतीव्यवसाय असून त्याचबरोबर कुक्कुटपालन, यंत्रमाग, द्राक्षबाग, सोने-चांदी गलई हे इतर व्यवसाय आहेत. रेणावी, शुक्राचार्य, डोंगराई, सागरेश्वर ही तालुक्यातील पर्यटन स्थळे असून राज्यात खानापूर तालुका कडेगावचे ताबूत, विटयाची पालखी शर्यती, रेवणसिध्द भाकणूक, कुंभारगावची आईची यात्रा या धार्मिक उत्सवाबद्दल प्रसिध्द आहे.[3]

आजअखेर खानापूर तालुक्यात एकही मोठा पाटबंधारे प्रकल्प पाणी पुरवठयासाठी नाही. येरळवाडी हा मध्यम स्वरुपाचा पाटबंधारे प्रकल्प अस्तित्वात आहे. कृष्णा-कोयना उपसा जलसिंचन (ताकारी) योजनेत खानापूर तालुक्याचा काही भागाचा समावेश आहे. परंतु सदरच्या योजनेच्या पूर्णत्वाविषयी व यशस्वीतेविषयी मोठया प्रमाणात साशंकता व अनिश्चितता सध्या तरी दिसते. यासाठी ही योजना गतीने पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या योजनेवरच खानापूर तालुक्याच्या उज्वल भवितव्याचे चित्र अवलंबून आहे.

# SANGLI DISTRICT

## Drought Prone Area, 1973.






Fig.





Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India.

© Government of India copyright. 1993.

स्थलनिर्देशक [ टोपोशिट ] नकाशावर बाळराजा स्मृती धरण परिसर

टोपोशिट नं. मध्ये ४७ के/८



**बळीराजा धरण ठिकाण :-**

बळीराजा धरणाचा जन्म कायमस्वरूपी दुष्काळ असणा-या खानापूर तालुक्यातील बलवडी व तांदुळवाडी गावांच्या सीमेवरून वाहणा-या येरळा नदीच्या पात्रात झालेला आहे. हे धरण या दोन्ही गावांच्या भौगोलिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीतून प्रामुख्याने जन्माला आलेले आहे म्हणूनच प्रथम या परिसरातील भौगोलिक वैशिष्टयांचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

2.2 **भौगोलिक परिस्थिती :-**

एकंदरीत खानापूर तालुका हा भौगोलिकदृष्टया सांगली जिल्हयात आपले वेगळे स्थान दाखवितो. खानापूर तालुक्यात पूर्व व पश्चिम असे दोन भाग पडतात. पश्चिम भागापेक्षा पूर्वभाग हा कमी विकसित प्रकारात गणला जातो. या तालुक्यात नियमितपणे पाऊस पडत नाही. नैसर्गिक प्रतिकुलतेचा शाप येथील जनतेला पूर्वापार मिळालेला आहे.

अ. **भौगोलिक स्थान :-** खानापूर तालुक्यातील येरळा नदीच्या खो-यात उजव्या व डाव्या तीरावर अनुक्रमे बलवडी व तांदुळवाडी ही दोन खेडी वसलेली आहेत. हीच खेडी पर्यायी विकासनीतीच्या चळवळीची केंद्रे म्हणून अलिकडे प्रसिध्दीस आलेली आहेत. या दोन ग्रामीण वसाहतींचे स्थान अनुक्रमे $17^{0}.7"$ उत्तर ते $17^{0}.15"$ उत्तर अक्षवृत्त व $74^{0}.25"$ पूर्व ते $74^{0}.30"$ पूर्व रेखावृत्तावर आहे.[4] या दोन्ही गावचे एकूण क्षेत्र 1845.43 हेक्टर्स इतके आहे. बलवडी गावचे भौगोलिक क्षेत्र 1389 हेक्टर असून बागायत क्षेत्र फक्त 22 हेक्टर आहे. तर तांदुळवाडीचे एकूण क्षेत्र 389 हेक्टर असून बागायत क्षेत्र 12 हेक्टर आहे.[5] बलवडी गावची लोकसंख्या 1990-91 च्या जनगणनेनुसार 2156 असून तांदुळवाडीची लोकसंख्या 865 इतकी आहे.[6] ही दोन्ही गावे भौगोलिकदृष्टया अत्यंत जवळच वसलेली असून या दोन्ही गावाच्या मध्यातून येरळा नदी वाहते आहे. ही नदीच दोन्ही गावची भौगोलिक सीमाहद्द समजली जाते. ही खेडी जुन्या काळापासून अस्तित्वात असल्यामुळे ती ग्रामीण जीवनाशी पूर्णतः एकरूप झालेली आढळतात.

बलवडी-तांदुळवाडीच्या ईशान्यपूर्व भागात आळसुंद-वाझर, आग्नेय दक्षिण भागात आंधळी-पलूस, पश्चिम नैऋत्य भागात कुंडल-कुंभारगाव-देवराष्ट्रे तर उत्तर वायव्य भागात भाळवणी-रामापूर-कमळापूर या गावांच्या सीमाहद्दी आहेत.

ब. **भूमीस्वरूप** :- बलवडी व तांदुळवाडी गावच्या सभोवतालचा प्रदेश सपाट आहे. सभोवताली विस्तृत असा पठारी प्रदेश आहे. दोन्ही गावच्या मध्यातून येरळा नदी वाहत असल्यामुळे तिच्या खो-याचा प्रदेश लाभलेला आहे. या नदीच्या पात्रात वाळूचा बराचसा मोठा साठा आढळतो. (सध्या तो बराचसा कमी झालेला आहे.) ही वाळू इमारत बांधकामासाठी चांगल्या दर्जाची म्हणून ओळखली जाते. येरळा ही या परिसरातील एकमेव नदी असून तिचा उगम सातारा जिल्हयातील म्हसकोबाच्या डोंगरात झालेला आहे. तिचा संपूर्ण प्रवासमार्ग अवर्षणप्रवणभागातून असल्याने व तिची लांबी कमी असल्याने ती फक्त मोसमी स्वरूपात वाहणारी नदी म्हणून ओळखली जाते. जलप्रणालीत या नदीशिवाय दुसरे काहीही या परिसरात आढळत नाही.

क. **हवामान** :- हवामानाच्या प्रतिकुलतेमुळे वर्षानुवर्षे हा प्रदेश मागासलेला राहिला आहे. येथील लोकांना जीवनाचा अर्थ यामुळेच समजला असून जीवनासाठी संघर्ष यातूनच जन्माला आला आहे. राज्यशासनाच्या 1974 च्या अभ्यास समितीने खानापूर तालुक्याचा अवर्षणप्रवणक्षेत्रात समावेश केलेला आहे. या तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी आढळते. येथील लोकांना सतत पाणीप्रश्नाला तोंड द्यावे लागते. बलवडी-तांदुळवाडी परिसरात तर वार्षिक सरासरी पर्जन्यमान केवळ 30 सें.मी.इतके आहे.[7] या परिसरातील पर्जन्यमान सरासरीने कमी तर आहेच पण पावसाळ्यातील कोरडाकाळ, पावसाची येण्या-जाण्याची अनिश्चितता, टंचाई व वारंवार पडणारे दुष्काळ आणि मोजता न येण्याइतका कमी पाऊस ही काही ठळक वैशिष्टये शेती अर्थव्यवस्थेवर परिणाम करत असल्याची दिसतात.

जून ते सप्टेबर या पावसाळी 120 दिवसाच्या काळातील येथे पावसाच्या दिवसाचे प्रमाण फक्त 21 ते 36 दिवस इतकेच असते म्हणजेच 365 दिवसापैकी वर्षातील 329 ते 344 दिवस या परिसरात कोरडे असतात.[8] भर पावसाळा कोरडा जात असल्यामुळे पिकांच्या पेरणीवर व वाढीवर मोठया प्रमाणात परिणाम होतो. येथील शेतकरी पडलेल्या पावसावर पेरणी करतात. परंतु काही वेळेला कोरडाकाळ आला की पीक पावसाअभावी

वाहून जाते. अशावेळी त्यांच्याजवळचे बियाणेही संपलेले असते. शेतक-यांची अशी दैन्यावस्था येथील प्रतिकूल हवामानामुळे ब-याचवेळा निर्माण होते.

या परिसरातील शेती व शेतक-यांच्यावर पिढयान्पिढया दुष्काळाचे सावट असल्याचे दिसते. दुष्काळ ही या भागातील लोकांना वारंवार भेडसवणारी नैसर्गिक आपत्ती असून येथे सर्वसाधारणपणे प्रति तीन वर्षाला एक याप्रमाणे दुष्काळ पडत आहेत. प्रतिवर्षी पावसाळ्यातील कोरडया दिवसामुळे टंचाईची परिस्थिती निर्माण होते. अशा या दुष्काळी व टंचाई परिस्थितीला येथील शेतकरी कंटाळला असून दुष्काळाला सामोरे जाणे हे आता त्यांचे नित्याचे बनले आहे. दुष्काळाने होरपळून निघत असलेल्या येथील जनतेला हे जीवन नकोसे झाले आहे. कारण दिवसेंदिवस येथी प्रतिकूल हवामानामुळे परिस्थिती वाईटच बनत चालली आहे. आजच्या व उद्याच्या काळ्जीने येथील लोकांची दैना होऊ लागली आहे. या परिस्थितीने अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहे. काही देशोधडीला लागली आहेत. अशा प्रकारच्या दुष्काळी परिस्थितीवर केवळ तात्पुरता उपाय करुन हा जीवघेणा प्रश्न सुटणार नाही याची जाणीव येथील कष्टकरी जनतेला होऊ लागली.

ड. **भूगर्भीय रचना :-** बलवडी-तांदुळवाडीचा प्रदेश हा समुद्र सपाटीपासून 780 मीटर उंचीवर असून या प्रदेशाच्या जडणघडणेला एक इतिहास आहे. दख्खनच्या पठाराचाच हा भाग असल्याने या प्रदेशाची भूगर्भीय रचना अंतर्गत हालचालीच्या परिणामातून निर्माण झालेली आहे. कठीण अशा खडकांच्या रचनेमुळे पडणा-या पावसाचे पाणी जमिनीमध्ये मुरु शकत नाही. दिवसेंदिवस कमी होणा-या पावसाच्या प्रमाणाबाहेर पाणी जमिनीत मुरण्याची प्रक्रियासुध्दा मंदावत चालली आहे, याची अनेक कारणे असली तरी दुर्बल शेतक-यांच्याकडून होणारी जमिनीची वरवरची मशागत, वृक्षतोड, चुनखडी व इतर क्षारांचे भूपृष्ठावर होणारे संचयन ही काही महत्त्वाची कारणे देता येतील. या परिसरातील पूर्वीच्या पुरेशा पाणी देणा-या विहिरी आज फारच कमी पाणी देत आहेत तर पूर्वीच्या जुजबी पाणी देणा-या विहिरी आज पूर्णपणे कोरडया पडल्या आहेत.[9]

इ. **जमीन रचना :-** बलवडी व तांदुळवाडी या दोन्ही गावच्या जमिनीमध्ये बरेच साम्य आहे. एकंदरीत येथे चार प्रकारची जमीन आढळते. दोन्ही गावाच्या मध्यातून जाणा-या येरळेच्या पात्रात मातीचा वाळूप्रकार आढळतो. ही वाळू पिकाच्या दृष्टीने

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

उपयुक्त नसली तरी बळीराजा धरणाच्या उभारणीत तिचा सिंहाचा वाटा आहे. येरळेच्या पात्रालगत दोन्ही बाजूला तिच्या संचयन कार्यामुळे निर्माण झालेली गाळाची जमीन मर्यादित स्वरूपाची आढळते. ही जमीन पिकांच्या दृष्टीने अतिशय सुपीक असली तरी तिचे क्षेत्र फारच कमी आहे. पात्रालगतची अशाप्रकारची जी सार्वजनिक जमीन उपलब्ध आहे ती पात्रालगतच्या शेतक-यांनी अतिक्रमण करून आपल्या ताब्यात घेतली आहे. अलिकडे या वादग्रस्त जमिनीतील पिकाच्या मालकीवरून शासन व अतिक्रमण करणारे शेतकरी यांच्यात संघर्ष सुरू झालेला आहे. हा संघर्ष पेटता ठेवण्याचे काम गावातील काही प्रस्थापित व हितसंबंधी राजकीय मंडळी करीत आहेत. त्यामुळेच शासन व संबंधित शेतकरी येरळेच्या पात्रात एकमेकांच्याविरुध्द शस्त्रे घेवून उभे राहिल्याच्या घटना अनेक वेळा घडल्या आहेत. काही वेळेला तर येरळेच्या पात्राला युध्दभूमीचे स्वरूप प्राप्त झालेले होते. शासनाने संबंधित जमिनीतील ऊसासारखी पिके जप्त केल्याची उदाहरणे आहेत. सध्या त्या संदर्भात न्यायालयात खटले चालू आहेत. संबंधित प्रकरणात प्रतिष्ठीत राजकीय मंडळी आपले हेवेदावे जोपासण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

नदीच्या तीरावर दोन्ही बाजूला काळया रेगूर प्रकारच्या जमिनीचे नदीपात्राला समांतर असे पट्टे आहेत. ही जमीनसुध्दा शेतीपिकाला उपयुक्त आहे. मातीचा चौथा प्रकार म्हणजे गावाच्या सर्व सीमाभागामध्ये असणारी मूरमाड-कमी प्रतीची व कमी खोलीची तांबूस-काळसर रंगाची जमीन आहे. या जमिनीचे क्षेत्र मोठे असले तरी ही जमीन कमी कसदार आहे. त्यामुळे शेतीच्या दृष्टीने ती कमी महत्त्वाची आहे.

पुरोगामी विचारांची परंपरा असलेल्या या गावांच्यामध्ये जमिनीचे विषम वाटप झाल्याचे चित्र आजसुध्दा पहावयास मिळते. मूठभर शेतक-यांच्या मालकीचेच जमिनीचे बरेचसे क्षेत्र असून अल्पभूधारक, मध्यम भूधारक शेतक-यांची संख्या मोठी आहे.

## 2.3 आर्थिक परिस्थिती :-

जगात ब-याच देशात राज्यक्रांत्या, उठाव, आंदोलने, परिवर्तन चळवळी झाल्या आहेत. या सर्वांचा अभ्यास करता असे दिसून येते की, त्यापाठीमागे तेथील आर्थिक प्रश्न महत्त्वाचा होता. आज सुध्दा जगात अनेक ठिकाणी आर्थिक प्रश्नावरूनच अंतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर संघर्ष सुरू आहे. बळीराजा धरणाची उभारणी बलवडी-

तांदुळवाडी गावातील लोकांच्या आर्थिक प्रश्नातूनच झालेली आहे.

सदरची गावे अवर्षण प्रवणक्षेत्रातील असून या ग्रामीण वसाहतींचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. येथील शेती पूर्णतः पावसावर अवलंबून आहे. तसेच येथील शेती पूर्णतः पावसावर अवलंबून आहे. तसेच येथील जमीनही चांगल्या प्रतीची नाही. खानापूर तालुक्यात शेतीला पाणीपुरवठा करणारा एकही मोठा पाटबंधारे प्रकल्प अस्तित्वात नाही. बलवडी-तांदुळवाडी गावांच्यामधून जरी येरळा नदी वाहत असली तरी सध्या ती फक्त पावसाळ्यात 10 ते 15 दिवस वाहत असते. वर्षभरातील इतरवेळा मात्र तिचे पात्र कोरडे ठणठणीत पाहावयास मिळते. 1972 च्या दुष्काळानंतर नदीला पावसाळ्यात क्वचितच पूर आले आहेत. या दोन्ही गावांतील बहुतांशी कुटुंबे शेती व्यवसायावरच अवलंबून आहेत. पाणी टंचाईमुळे येथे कोरडवाहू पध्दतीची शेती केली जाते. जे काही थोडया प्रमाणात बागायतीक्षेत्र येथे पहावयास मिळते ते गावातील सधन, भांडवलदार व प्रस्थापित राजकीय मंडळी यांच्या मालकीचे आहे. वारंवार दुष्काळ, अनुत्पादक शेती, पाणी टंचाई व शासकीय विकासकार्यापासून वंचित/दुर्लक्षित भाग यामुळे येथे मोठया प्रमाणात आर्थिक मागासलेपणा दिसून येतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या 40 वर्षाच्या विकास-पर्वामध्ये या भागातील दुष्काळ निमूर्लनासाठी शासनाने भरीव असे काम केले नाही. तसेच दुष्काळावर कायमस्वरूपी उपाय योजना करण्याच्या दृष्टीने काहीही केले नाही. त्यामुळे येथील शेतीचे चित्र अतिशय निराशाजनक दिसते. प्रतिवर्षी टंचाई परिस्थिती व दुष्काळाने होरपळून निघालेला शेतकरी आर्थिकदृष्टया पूर्णपणे कोलमडून पडलेला आहे. तो पूर्णपणे दुर्बल, जर्जर झालेला आढळतो. त्यामुळेच येथे शेती हा उद्योग न राहता तो केवळ एक पारंपारिक विधी म्हणूनच केल्याचे आढळते. पावसाच्या अनिश्चिततेतीमुळे शेतीचे स्वरूप पारंपारिक असेच झाले झाले आहे व हीच परिस्थिती येथे वर्षानुवर्षे टिकून राहिली आहे त्यामुळे शेतीव्यवसायावर उदरनिर्वाह करणे शेतक-यांना कठीण झालेले आहे.

येथील शेतीमध्ये प्रामुख्याने पावसावर आधारित अशा प्रकारची संकरित ज्वारी, बाजरी, भुईमूग, कडधान्ये अशा प्रकारची पिके घेतली जातात. बलवडी गावामध्ये 1970 साली (येरळेला पाणी होते) येरळेतून दत्त लिफ्ट इरिगेशन व जोतिर्लींग लिफ्ट इरिगेशन या दोन उपसा जलसिंचन योजना भूविकास बँकेच्या अर्थसहाय्याने सुरू केल्या होत्या. परंतु 1972 च्या दुष्काळानंतर पाण्याच्या टंचाईमुळे त्या पूर्णपणे बंद पडल्या नंतर काही वर्षांनी

भूविकास बँकेने सभासदांच्या कर्जापोटी या योजनांची विक्री केली व आज या योजनांचे अवशेषही येथे पाहावयास मिळत नाहीत· येथील शेतक-यांना शेतीसाठी कर्जपुरवठा, भूविकास बँक विटा, रामानंदनगर या शाखामधून केला जातो· तसेच काही राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था, बलवडी येथील सर्व सेवा सहकारी सोसायटी, आळसुंद येथील सहकारी सोसायटी, सांगली जि·म·बँक यामार्फतही येथील शेतक-यांना कर्जपुरवठा केला जातो· अशाप्रकारच्या संस्था व बँकाकडून लोकांना अर्थसहाय्य उपलब्ध होत असले तरी येथे दुष्काळाचे सावट नेहमीच असल्यामुळे शेतीव्यवसाय पूर्णपणे तोटयात चालला आहे· त्यामुळे शेतीसाठी घेतलेली कर्जे परत करणे शेतक-यांना कठीण झाले आहे· शेतीतून निघणारे उत्पादन दिवसेंदिवस कमी होत असले तरी काढलेल्या कर्जाच्या व्याजाचा बोजा शेतक-याच्या डोक्यावर दिवसेंदिवस वाढत चालला आहे· बँका, सहकारी संस्था यांनी कर्जवसुलीसाठी शेतक-यांची मालमत्ता जप्त करून त्यांचा संसार रस्त्यावर आणल्याच्या अनेक घटना येथे घडलेल्या आहेत· थोडक्यात येथील शेतकरी वर्ग, बँका, सहकारी संस्था, सावकार व सरकारी कर्जाच्या बोजाने पूर्णपणे दबलेला आहे·

स्वातंत्र्यप्राप्तीपासून हा परिसर विरोधी पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो· त्यामुळे सत्ताधा-यांनी या भागाकडे विकासाबाबत नेहमीच दुर्लक्ष केलेले आहे· विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही सत्ताधा-यांना शह देण्यासाठी पर्यायी विकासयोजना किंवा एखादा मोठा प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न केलेला नाही· उलट खेकडाप्रवृत्तीने एकमेकांना संपविण्यासाठीच आपल्या राजकीय स्थानांचा वापर केल्याचे दिसते· येथील जनतेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असणा-या संस्था, उद्योग उभारण्याचा प्रयत्न न करता फक्त जुजबी प्रश्नासाठी व तो ही ठराविक काळात संघर्ष करण्याचे धोरण स्वीकारून आपले नेतृत्व मात्र अबाधित राखण्याचे प्रयत्न केले आहेत· थोडक्यात या भागाचा कायापालट घडवून आणण्यासारखा या परिसरात सरकारी अथवा खाजगी उद्योगधंदा अस्तित्वात नाही·

वाढती लोकसंख्या व मर्यादित जमिनीचे क्षेत्र व त्या शेतीतील तोकडे उत्पादन यांचा मेळ घालणे शेतक-यांना कठीण झाले आहे· स्थानिक साधन संपत्तीच्या तोकडेपणामुळे व्यवसायाच्या इतर क्षेत्राचा विकास झालेला नाही· शासनानेही भरीव असे विकासाचे काम या भागासाठी केलेले नाही· त्यामुळे येथे मोठया प्रमाणात बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला त्यातून 1982 पूर्वी या दोन्ही गावातील बहुतांशी तरूणवर्ग मुंबई व

देशातील इतर शहरांकडे कामासाठी स्थलांतरीत झाला· यापैकी बहुतेक मंडळींनी मुंबईच्या कापड गिरण्यात कामगार म्हणून नोक-या पत्करल्या· गिरणगावातील यंत्राशी जुळवून घेऊन तो रात्रंदिवस राबराब राबू लागला· आपल्या उदरनिर्वाहासाठी पगारातील थोडे पैसे ठेवून बाकीची रक्कम गावाकडे आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी मनिऑर्डरने पाठविली जाई· त्यामुळे काही काळ या गावातील अर्थव्यवस्था मनीऑर्डर पध्दतीचीच राहिली होती· परंतु 1982 च्या मुंबईच्या गिरणी कामगारांच्या ऐतिहासिक संपाने ही परिस्थितीही संपुष्टात आली· संपामुळे बेकार झालेले गिरणी कामगारांचे लोंढे परत गावाकडे आले· येथील कोरडवाहू शेती उत्पादनावर आणखी यांचा बोजा वाढला·

तुटपुंज्या शेती उत्पादनावर खाणारी तोंडांची संख्या वाढली· अन्नधान्याचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला· आधीच दारिद्र्याच्या विळख्यात अडकलेल्या येथील शेतकरी कुटुंबांची आणखी होरपळ सुरू झाली· यातून स्वतःच्या मालकीची जमीन, घरे, भांडी विकायची पाळी या शेतक-यांच्यावर आली· कृष्णाकाठच्या काही श्रीमंत मंडळीमध्ये येथील जमीन खरेदी स्पर्धा सुरू झाली· यातून हवालदिल जमीनमालक व उतावीळ जमीन खरेदीदार यांच्यात संवाद साधून देणारे काही दलाल निर्माण झाले· या दलालांनी दुस-याची जमीन व दुस-याचा पैसा आपल्या बुध्दिचातुर्याने वापरून स्वतःचे उखळ पांढरे करून घेतले· अशा प्रकारे सरकारी कर्ज, बँका, खाजगी सावकारांचे कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या कष्टक-यांना रोजगारही उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या मनामध्ये जीवनाविषयी पूर्णपणे नैराश्य निर्माण झाले· त्यातून काही मंडळी पत्ते, जुगार, लांडीलबाडी यात गुरफटली तर काही दारू व इतर व्यसनाच्या आधीन गेली· तसेच काही गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळली· अशा या दिशाहीन मंडळींना योग्य दिशा देणा-या नेतृत्वाची पोकळी डॉ·भारत पाटणकर व त्यांच्या सहकारी मित्रांनी भरून काढली· येथील शेतकरी, शेतमजूर जनतेची दुर्बलता नष्ट करण्यासाठी व या भागातील राबणा-या मंडळींची विकलांग परिस्थिती नाहीशी करण्यासाठी तसेच शासनाकडून आपल्या न्याय्य मागण्या मान्य करून घेण्यासाठी "मुक्ती संघर्ष" चळवळीची स्थापना केली· या चळवळीमार्फत आपल्या हक्कांच्यासाठी शासनाबरोबर मोर्चे, धरणे, सत्याग्रह, उपोषण या मार्गांनी संघर्ष केला· परंतु शासनाने येथील बेकारी, बेरोजगारीचा प्रश्न तर सोडविला नाहीच उलट येथील कायमस्वरूपी दुष्काळ हटविण्याच्या संदर्भात योग्य प्रकारची हालचालही केली नाही· त्यामुळेच दुष्काळाने

पिचलेल्या परंतु स्वाभिमानाने ताठ असलेल्या येथील कष्टक-यांनी दुष्काळी परिस्थितीवर उपाय योजना करण्याचे व स्वतःच त्याचे नियोजन करण्याचे ठरविले.

2.4 **सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी :-**

बलवडी-तांदुळवाडी येथील जनतेवर म.फुले, शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा प्रभाव आहे. सत्यशोधक चळवळीचे कार्यही या परिसरात चांगल्या पध्दतीचे आहे. येथे आजसुध्दा अनेक लग्ने सत्यशोधक पध्दतीने केली जातात. या दोन्ही गावात हिंदू-मुस्लिम, बौध्द धर्माची मंडळी गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहेत. सर्वधर्मीय लोक आपापले सण मोठया भक्तीभावाने व उत्साहाने साजरे करतात. येथील लोकांनी धर्मनिरपेक्ष, सहिष्णूवृत्तीचा स्वीकार केलेला असून त्यांच्यावर गांधीवादाचाही मोठा पगडा आहे. येथील ग्रामस्थांनी मुक्ती संघर्ष चळवळीतील दिल्लीच्या कार्यकर्त्या नागमणी राव व चळवळीतील केरळचे कार्यकर्ते के.जे.जॉय यांचा सत्यशोधक पध्दतीने बलवडी येथे विवाह करून दिला. तसेच कर्नाटकातील रायबाग परिसरातील भटक्या जमातीचे राम (बहुरूपी) कुटुंबांना बलवडी येथे राहण्यासाठी मोफत जागा देवून त्यांना उदरनिर्वाहासाठी पशुपालन व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले. त्यासाठी महाराष्ट्र बँकेतर्फे अर्थसहाय्य मिळवून दिले. तसेच या कुटुंबातील मुला-मुलींच्या लग्नामध्ये ग्रामस्थांनी सर्व प्रकारची मदत केली. या कुटुंबातील मुलांना शाळेत पाठवून प्रथमच या जमातीच्या झोपडीत शिक्षणाचा सुगंध दरवळला. बलवडी-तांदुळवाडीच्या ग्रामस्थांमुळेच आज प्रथम या कुटुंबातून शिक्षणाची गंगा वाहत असल्याचे दिसते. या दोन्ही गावात अनेक जातीची मंडळी असली तरी आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा जातीय संघर्ष येथे निर्माण झालेला नाही. बलवडीचे पोलीस पाटील पद हरिजन व्यक्तीकडे असून येथील अल्पसंख्यांक व मागासवर्गीयांना "मंडल आयोगाच्या शिफारशीपूर्वीच" सर्व क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधित्व दिलेले आहे. अलिकडच्या काळात येथील अल्पसंख्यांक सत्ता संतुलन व सत्ता स्पर्धेत अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतात. येथे शिवजयंती, सिध्देश्वर यात्रा, रामनवमी, ज्ञानेश्वर पारायण याबरोबरच डॉ.आंबेडकर जयंती, आण्णाभाऊ साठे जयंती व पीरसाहेब उत्सव मोठया भक्तीभावाने साजरे केले जातात.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाच्या ज्या काही विकासाच्या योजना या भागापर्यंत पोहोचल्या. त्याच्या या भागातील लोकांनी फायदा करून घेतला आहे. ही दोन्ही गावे

विटा-कुंडल या डांबरी रस्त्यावर असल्याने तालुक्याशी, तसेच औंध-सांगली या रस्त्याजवळ असल्याने, जिल्हयाशी यांना लवकर संपर्क साधता येतो· शेती विकासाच्या दृष्टीने सहकारी सोसायटी, ग्रामीण बँकांचे सहकार्य, शेती मदतनीस, येरळेवर बंधारा व क्रांतीसिंह नाना पाटील पूल, पाझर तलाव, नालाबंडिग, बांधदुरूस्ती, बेनार योजना, शेतीसाठी वीजपुरवठा इ· सुविधा शासनाने उपलबध केलेल्या आहेत· तसेच गावातून वीजपुरवठा, आरोग्य सेवा, पोस्ट, प्राथमिक शिक्षण, फोन अशासारख्या ग्रामविकासाच्या सुविधाही उपलब्ध झालेल्या आहेत·

बलवडी-तांदुळवाडी ही गांवे पुरोगामी विचारांची व पर्यायी विकासाची केंद्रे म्हणून उदयाला येत असली तरी दोन्ही गावे शैक्षणिक सुविधापासून वंचितच राहिलेली आहेत· बलवडी येथे ब्रिटीश काळापासून 4 थी पर्यंत व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फक्त 7 वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे· तर तांदुळवाडीमध्ये फक्त 4 थी पर्यंतच्या प्राथमिक शिक्षणाची सोय आहे· माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना बाहेरगावी जावे लागते· त्यामुळे पुढील शिक्षणाबाबत येथील विद्यार्थ्यांच्यात व पालकांच्यात उदासीनता व नैराश्यपणा आढळून येतो· मुलींना तर माध्यमिक शिक्षणालाही मुकावे लागते· त्यामुळे या दोन्ही गावातील अल्पशिक्षितांची संख्या मोठया प्रमाणात आढळते· स्थानिक राजकीय मंडळीही शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील तर नाहीतच उलट सध्याचे शिक्षण व शिक्षण पध्दतीविषयी युवक व इतर समाजात गैरसमज पसरविण्याचे काम मात्र जाणीवपूर्वक करतात· त्यामुळे गावातील अल्पशिक्षित बेकार तरूणांचे तांडेच्या तांडे गावातील प्रस्थापित व जमीनदारांच्या शेतात अल्प मजुरीवर राबताना दिसतात· अशा या दिशाहीन व संभ्रमावस्थेत असलेल्या अल्पशिक्षित बेकार तरूणांचा व त्यांच्या कुटुंबाचा साधन म्हणून गावातील प्रस्थापित नेतेमंडळी वापर करतात·

या परिसरातील शेतकरी, शेतमजूर यांच्या हलाखीची जाणीव असलेले रामापूर गावचे साथी बा·न·राजहंस यांनी राज्यातील शेतमजूर, कामगार व इतर मजुरांच्या प्रश्नांसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची टाकलेले आहे· त्यांनी शेतमजूरांचे नेते म्हणून राज्यपातळीवर काम करीत असताना आपल्या मातीशीही इमान राखले होते· त्यांनी या परिसरातील कष्टक-यांच्या प्रश्नाविषयी आपल्या पातळीवर सतत पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला होता·

तसेच स्वातंत्र्य लढयातील प्रतिसरकारमधील क्रांतीअग्रणी भाई जी·डी·तथा बापूसाहेब लाड यांनी खानापूर तालुक्यातील दुष्काळग्रस्तांचे अश्रू पुसण्याचे महत्त्वपूर्ण काम हाती घेतले आहे· या तालुक्यातील काही गावांना कृष्णेचे पाणी देण्याचा त्यांनी प्रयत्न सुरु केला आहे· त्यानुसार कुंभारगाव, बलवडी या गावातील शेतीला पाणीपुरवठा केला आहे· तर बलवडीचा बाकी भाग व रामापूरचे क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे त्यांचे ध्येय आहे· त्यांनी खानापूर तालुक्याला शामगाव खिंडीतून पाणी देण्याच्यासंबंधी आग्रही भूमिका मांडली आहेच-त्याचबरोबर कृष्णा-कोयना उपसा जलसिंचन योजना गतीने पूर्ण होण्यासाठी आंदोलन करीत आहेत·

बलवडी गावाच्या पूर्वेस 3 कि·मी·अंतरावरील आंधळी गावच्या हिंदकेसरी गणपतराव आंदळकर यांनी कुस्तीक्षेत्रात बहुमोल व नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे· तसेच या परिसरातील एक धडाडीचे आमदार डॉ·पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठामार्फत शैक्षणिक क्षेत्रात लक्षणीय प्रगती करुन पुण्यासारख्या शहरात व महाराष्ट्रात नावलौकीक मिळविला आहे· परंतु खानापूर सारख्या दुष्काळी तालुक्यात त्यांनी वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे· कुंडलचे कै·तांबट काका यांनी खानापूर तालुक्यातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना नाना पाटील बोर्डींगमध्ये प्रवेश देवून शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली त्यामुळेच या परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊ शकले हे सत्य नाकारता येत नाही·

<u>बलवडीचे क्रांती स्मृतिवन</u> : -

बलवडी येथून 5-6 कि·मी·अंतरावर मानवनिर्मित सागरेश्वर अभयारण्य आहे· याचे निर्माते वृक्षमित्र धो·म·मोहिते यांनी 1978 साली देशातील पहिली वृक्षदिंडी काढली होती· त्यांच्या आदर्शाचा प्रभाव या दोन्ही गावातील लोकांच्यावर आहे· त्यामुळेच वृक्षलागवडीला येथे मोठया प्रमाणात प्राधान्य दिल्याचे दिसते· वृक्षमित्र धो·म·मोहिते यांच्यापासून प्रेरणा घेवून बळीराजा धरण परिसरात भाई संपतराव पवार यांनी 21 जानेवारी, 1992 रोजी "ऑगस्ट 1942 क्रांतीस्मृतीवन" उभारणीला प्रारंभ केला· 1942 च्या क्रांतीची परंपरा स्फुर्ती नव्या पिढयांना देणारे नव्या युगाचे प्रबोधन केंद्र संपतराव पवारांनी सुरु केले· या क्रांती स्मृतीवनात, 1857 ते 1947 पर्यंतच्या स्वातंत्र्यलढयात

ज्या क्रांतीकारकांनी व स्वातंत्र्य सैनिकांनी योगदान केले, हौतात्म्य पत्करले त्यांच्या नावे स्मृतीवृक्ष लावले आहेत· आतापर्यंत लिंब, आंबा, चिंच असे 481 स्मृतीवृक्ष लावण्यात आले आहेत· स्मृतीवनात केशवराव पवार (क-हाड), औदुंबर विश्वनाथ भिंगे (आटपाडी), कर्मवीर भाऊराव पाटील, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब शिंदे (नगर), साने गुरूजी यांच्या नावाने स्मृती छावण्या उभ्या केल्या आहेत· ज्येष्ठ समाजवादी नेते बा·न·राजहंस यांच्या स्मृत्यर्थ स्मृतीवनात पॅगोडा तर भिलवडीचे स्वातंत्र्य सैनिक डॉ·वा·गो·गोसावी यांच्या स्मरणार्थ जलकुंभ उभा केला आहे· क्रांतिसिंह नाना पाटील स्मृती सिंचन व्यवस्थेतून स्मृतिवनातील झाडासाठी सिंचन व्यवस्था करण्यात आली आहे· लो·टिळकांच्या स्मृत्यर्थ येरळेमध्ये विहीर खणण्याची, तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या स्मृत्यर्थ दीपस्तंभ उभारण्याची योजना आहे· स्वातंत्र्य युध्दात भाग घेतलेल्या वीरांची स्मृती जपणे, त्यातून नव्या पिढीसाठी स्फुर्तिस्त्रोत निर्माण करणे, पर्यावरण संरक्षणाचे व संवर्धनाचे महत्त्व पटवून देणे आणि आधुनिक काळातील वैचारिक मंथनाचे एक व्यापक व्यासपीठ उभारणे अशी अनेक उद्दिष्टे "क्रांतीस्मृतिवन" उभारणीमागे आहे·[10] हे क्रांतीस्मृतिवन परिसरातील शाळा-महाविद्यालयातील शेकडो विद्यार्थी-शिक्षकांनी श्रमदान स्मृतिवन उभारणीसाठी केले आहे·

## 2·5 ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

सांगली जिल्हा (पूर्वीचा द·सातारा) स्वातंत्र्यपूर्व काळापासून राजकीय दृष्टया जागरूक व ऐतिहासिकदृष्टया महत्त्वपूर्ण म्हणून ओळखला जातो· स्वातंत्र्यलढयात द·सातारा जिल्हा प्रथमपासून अग्रेसर होता· या जिल्हयातील खानापूर तालुकासुध्दा स्वातंत्र्य आंदोलनात क्रियाशील होता· 1942 च्या स्वातंत्र्यलढयात साताराच्या प्रतिसरकारने इंग्रजी सत्तेला "सळो की पळो" करून सोडले होते· बलवडी व तांदुळवाडी ही गावे प्रतिसरकारच्या कार्यक्षेत्रातील असून प्रतिसरकारची कर्मभूमी व राजधानी म्हणून ओळखल्या जाणा-या कुंडलच्या पूर्वेस 5-6 कि·मी·अंतरावर आहेत· त्यामुळेच या ग्रामीण वसाहतींच्यावर प्रतिसरकार व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव आढळतो·

स्वातंत्र्य चळवळीत सांगली जिल्हयातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी भाग घेतला होता· प्रत्येक गावागावातून प्रत्येक कुटुंबातून भारत मातेच्या मुक्ती लढयासाठी लोक स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले होते· त्यामध्ये वसंतराव दादा पाटील, स्वामी रामानंद

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

भारती, जी·डी·लाड, नाथाजी लाड, क्रांतीसिंह नाना पाटील, नागनाथ नायकवडी, बाबूजी पाटणकर, पांडू मास्तर, किसन अहिर, कासेगावकर वैद्य, आप्पा लाड, राम कॅप्टन, शेखकाका, धोंडीराम माळी, वि·स·पागे, धुळाप्पा नवले, गणपत कोळी, बाबूराव चरणकर, तांबट काका, बाळकृष्ण मोहिते, आकाराम पवार, भगवानराव मोरे, सदाशिव पवार, ज्ञानबा जाधव अशासारखी अनेक नेते मंडळी होती· स्वातंत्र्यलढयात बलवडी-तांदुळवाडी गावेही अग्रेसर होती· या गावचे स्वातंत्र्यशाहीर बाळकृष्ण कुलकर्णी, तडसरचे रा·तु·पाटील व शा·शंकरराव शिराळकर, कुंडलचे स्वा·शाहीर शंकरराव निकम सुप्रसिध्द गीतकार ग·दि·माडगूळकर यांनी द·सातारा भागात आपल्या पोवाडयांच्या व राष्ट्रभक्तीपर गीतांच्या सहाय्याने इंग्रजी सत्तेविरूध्द ग्रामीण जनतेमध्ये असंतोष निर्माण करून इंग्रजांविरूध्द लढण्यासाठी जनतेमध्ये स्फुल्लिंग निर्माण केले· शाहिरांनी आपल्या कलेव्दारे जनजागृती करून लोकांना स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले· त्यांच्या या कार्यामुळेच या परिसरातील तरूण त्याचप्रमाणे वृध्द व महिलांनीही मोठया संख्येने स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला· स्वातंत्र्यलढयातील ऋषितुल्य स्वामी रामानंद भारती यांचेही या परिसराशी अत्यंत निकटचे संबंध होते· त्यांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान महत्त्वपूर्ण आहे· त्यांनी आपल्या वाणीने व संघटना कौशल्य चातुर्याने किर्लोस्करवाडी परिसरातील अनेक लोकांना स्वातंत्र्यासाठी लढण्यास तयार केले होते· या सभ्य, संपन्न व्यक्तिमत्त्वाचा व विचारांचा प्रभाव आजही या भागात मोठया प्रमाणात आढळतो·

बलवडीच्या दत्तू यादव, दत्तू सावंत, गोविंद जाधव, बंडू गणू दुपटे, बाळकृष्ण कुलकर्णी, नामदेव जाधव, नारायण सावंत, शंकर महाजन, नामदेव बाळा सुर्यवंशी, राजाराम बापू पवार, गोविंदराव पवार, मारूती चव्हाण तसेच तांदुळवाडीच्या सुभराव चव्हाण या प्रमुख स्वातंत्र्य सैनिकांनी या परिसरातील स्वातंत्र्य लढयात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे·

अ· **क्रांतिसिंह नाना पाटलांचा प्रभाव :-** नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतरावदादा पाटील यांच्याप्रमाणेच जी·डी·लाड यासारखे अनेक नेते स्वातंत्र्यलढयाला द·सातारा जिल्हयाने दिले· इ·स·1932 पासून नाना पाटलांचा कुंडल व बळीराजा परिसरातील गावांशी सतत संपर्क होता· त्यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कर्मभूमी म्हणून हा परिसर पुनीत झाला आहे· नाना पाटलांनी येथील आपल्या जिवाभावांच्या

सहका-यांच्या पाठबळावरच आपली चळवळ उग्र केली होती· त्यांच्या कार्याने व नेतृत्वाने प्रभावीत झालेले हजारो निस्सीम भक्त आजसुध्दा या भागात त्यांच्या विचारांची पताका खांद्यावर घेवून कार्य करीत आहेत· नाना पाटलांच्या स्वातंत्र्य चळवळीतील सहभागामुळे या परिसराला सतत युध्द भूमीचे स्वरूप प्राप्त झाले होते· नाना पाटलांच्या पुढाकाराने या परिसरातील स्वातंत्र्य चळवळ सतत कार्यरत होती· नाना पाटलांनी खानापूर-तासगांव तालुक्यात तुफान प्रचार दौरा करून संपूर्ण भाग ढवळून काढला व 2 सप्टेबर 1942 रोजी तासगावच्या मामलेदार कचेरीवर भव्य असा इतिहासप्रसिध्द मोर्चा काढला· या मोर्चाचे नेतृत्व नाना पाटील, कृष्णा रामा कु-हाडे, वि·स·पागे, गोविंदराव खोत इ·कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी केले· या मोर्चात सुमारे दहा हजार लोक सामील झाले होते· काहीजणांच्याकडे भाले, कु-हाडी, काठया यासारखी हत्यारे होती· मोर्चातील लोकांची प्रचंड संख्या पाहून मामलेदाराने मार्चाच्या नेत्यांच्या कलानुसार वागावयाचे ठरविले· लोकांनी कचेरीवर तिरंगी झेंडा लावला आणि मामलेदार व इतर सरकारी अधिका-यांना गांधी टोप्या घालण्यास भाग पाडले· मोर्चा पूर्णपणे यशस्वी झाला·

तासगावच्या मोर्चानंतर 8 सप्टेबर 1942 रोजी इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीवर पांडू मास्तर व गोविंदराव खोत यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला· परंतु हा मोर्चा मामलेदार कचेरीजवळ येताच पोलिसांनी गोळीबार केला· त्यात कामेरीचे बारबटे व बळीराजा परिसरातील किर्लोस्करवाडीचे पंडया इंजिनिअर यांना हौतात्म्य प्राप्त झाले· दुस-या दिवशी वडूजच्या मामलेदार कचेरीवर नेण्यात आलेल्या मोर्चावरही पोलिसांनी अमानुष गोळीबार केला त्यात मोर्चाचे नेतृत्व करणारे परशुराम घार्गे व आणखी सात जणांना हौतात्म्य प्राप्त झाले·[11]

"तासगावच्या यशस्वी मोर्चाने कुंडल परिसरातील सर्वांनाचा स्फूर्ती मिळाली· यातूनच जवळचा किर्लोस्करवाडीचा कारखाना नाना पाटलांच्या नेतृत्वाखली क्रांतीकारकांनी बंद पाडला· कारखान्यातून कामगार बाहेर पडून "चले जाव" आंदोलनात सामील झाले· यातून नाना पाटलांची गोरगरीबांचा, कष्टक-यांचा, अन्यायाविरूध्द झुंजणारा नेता अशी प्रतिमा तयार झाली· त्यांनी आपल्या निवडक 400-500 सहका-यांसह खानापूर तालुक्याचा पायी प्रचार दौरा केला· "चले जाव" प्रचार दौ-यात नाना पाटलांच्या विनोदी फवा-यांच्या, लोकांना चेतना देणा-या व बोधपर गावरानी भाषेतील तसेच विशिष्ट

ढंगाच्या भाषणाने या परिसरातील लोकांना वेडावून टाकलेले होते· यातूनच या परिसरातील लोकांच्या अंतःकरणापर्यंत स्वातंत्र्याचा विचार भिडवला जाई आणि त्यामुळे लोकांमध्ये स्वातंत्र्याचा स्फुल्लिंग निर्माण होई·[12]

क्रांतिसिंह नाना पाटील केवळ राजकारणी नव्हते तर ते समाजसुधारकही होते· सामान्य माणसाला दोन वेळचे पोटभर जेवण मिळावे हा त्यांचा राजकारणाचा केंद्रबिंदू होता· अज्ञान, अंधश्रध्दा, धर्मांधता, उधळपट्टी, रूढीप्रियता, मागासलेपणा नष्ट होऊन बहुजन समाज सुशिक्षित व प्रगतिशील व्हावा, ही त्यांच्या समाजसुधारणेमागील तळमळ होती· नाना पाटील चलेजाव चळवळीच्या काळात सुमारे साडेचार वर्षे भूमिगत होते· या काळात त्यांचा मुक्काम कुंडल, पारे चिखलगोठण, घोटी, आटपाडी या परिसरात असे·[13] त्यामुळे त्यांचा बराचसा सहवास बळीराजा परिसरातील कष्टकरी जनतेला लाभला होता· म्हणूनच या परिसरातील शेतक-यांच्यावर स्वातंत्र्य चळवळीतील शुध्द चारित्र्याचा, प्रांजळ मनाचा, निःस्पृह, प्रखर, धाडशी, त्यागी, निष्ठावंत, गरिबांसाठी कणव असणारा, विशाल अंतःकरणाचा व साधी राहणी असणा-या क्रांतिसिंहाचा मोठया प्रमाणात प्रभाव आढळतो· अशा या आपल्या लाडक्या नेत्याकडूनच या परिसरातील श्रमिकांनी अन्याय, अत्याचाराविरूध्द संघर्ष करण्याचे तत्व स्वीकारले आहे· भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील या नायकाच्या शौर्यशील, त्यागी, व माणूसकीने भरलेल्या जीवनाचा आदर्श येथील रयतेने आपल्यापुढे ठेवलेला आहे· अशी परंपरा बलवडी-तांदुळवाडीच्या जनतेला आहे·

**ब· सातारच्या प्रति सरकारची परंपरा :-** "·····देशातील प्रत्येक प्रांताने स्वातंत्र्य आंदोलनात काही ना काही कामगिरी केली आहे· पण सातारा जिल्हयाने केलेल्या चळवळीला भारतीय इतिहासात तोड नाही···" अशा महत्त्वपूर्ण शब्दात सातारच्या स्वातंत्र्य चळवळीचा व प्रति सरकारच्या कार्याचा गौरव, थोर स्वातंत्र्यसैनिका श्रीमती अरूणा असफ अली यांनी पुणे येथे 20 फेब्रुवारी 1946 रोजी केला·[14]

प्रति सरकारची कर्मभूमी व प्रति सरकारच्या कार्याची परंपरा या परिसराला आहे· त्यामुळेच बळीराजा सारखा पर्यायी विकासनीतीचा एक अभिनव प्रयोग येथे जन्माला येऊ शकला· म्हणूनच प्रस्तुत प्रबंधिकेच्या निमित्ताने "सातारच्या प्रतिसरकार"चा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे·

1942 साली देशात अहिंसक मार्गाने ब्रिटिशाविरोधी सुरू झालेले "चले जाव" आंदोलन ब्रिटिशानी दडपशाहीच्या मार्गाने मोडून काढण्याचा प्रयत्न सुरू केला· अनेक कॉंग्रेस नेत्यांची धरपकड केली· त्यामुळे सातारा जिल्हयातील क्रांतिकारकांनी भूमिगत राहून परकीय सत्तेशी संघर्ष चालूच ठेवला· ब्रिटिशांच्या दडपशाहीच्या धोरणामुळे क्रांतिकारकांनी घातपाती कृत्ये करण्यास सुरूवात केली· भूमिगत चळवळीच्या पहिल्या अवस्थेपासून कुंडल गटाने प्रत्यक्ष कार्याच्या बाबतीत आघाडी मारली होती· या गटाने तारायंत्रे व टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वेची स्टेशने जाळणे, पोस्टाच्या पेटया पळविणे, पोलिसांची हत्यारे पळविणे, डाकबंगले जाळणे अशा प्रकारची घातपाती कृत्ये घडवून आणून ब्रिटिशांना हादरून सोडले होते· कुंडलबँक लुटीचाही जी·डी·लाडानी प्रयत्न केला· या कुंडल गटात, नाना पाटील, बापूसाहेब लाड, आप्पासाहेब लाड, नागनाथ नायकवडी, नाथाजी लाड, भगवानराव मोरे यांसारखे अनेक कार्यकर्ते होते·[15]

लोकांच्या उत्स्फूर्त व विलक्षण पाठिंब्यामुळे भूमिगत चळवळ ही केवळ कार्यकर्त्यांची चळवळ राहिली नव्हती, ती सर्व लोकांची बनली होती· तसेच सातारा जिल्हयातील भूमिगत कार्यकर्त्यांचा सरकारविरूध्दचा लढा तीव्र करण्याच्या उद्देशाने चळवळ अधिक संघटित व शिस्तबध्द बनविण्याचा प्रयत्न सुरू झाला· त्यातच 1942 साली येरवडा जेल फोडून बाहेर आलेले किसनवीर, 1943 साली सांगली जेल फोडून येणारे वसंतरावदादा, 1944 साली साताराचा जेल फोडून बाहेर आलेले नागनाथ नायकवडी व 1944 साली कराडचा सब जेल फोडून चार साथीदारासह बाहेर पडणारे माधवराव जाधव अशी धाडशी माणसे भूमिगत चळवळीची धुरीण होती· या नेत्यांनी ग्रामीण भागातील जनतेची मने जिंकलेली होती· सरकारला लुळे पांगळे बनविण्याचा धडक कार्यक्रम हाती घेतला होता· भूमिगत कार्यकर्त्यांनी समांतर सरकार स्थापन केले होते· यालाच प्रतिसरकार म्हणत· प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांनी सातारा जिल्हयातील दरोडेखोरांना, खब-यांना, गरिबांना लुटणा-या सावकारांना, देशद्रोहयांना पकडून शिक्षा दिल्या· या शिक्षेचे स्वरूप कठोर होते· गुन्हेगाराला उताणे पाडून त्याचे दोन्ही पाय वर उचलून धरीत आणि त्याच्या तळपायावर क्रांतिकारक काठीने फटके मारीत· या प्रकारालाच पत्री लावणे किंवा पत्री मारणे असे म्हटले जात असे· गुन्हेगाराच्या गुन्हयाप्रमाणे त्यास पाच-दहा-पंचवीस अशा फटक्यांची शिक्षा केली जाई· पत्रीच्या शिक्षेवरूनच प्रतिसरकारचे "पत्रीसरकार" असे नांव रूढ झाले·[16]

आपल्या प्रदेशातून ब्रिटिश सत्तेचे समूळ उच्चाटन करणे हे प्रतिसरकारचे प्रमुख उद्दिष्ट होतेच, तथापि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची व दैनंदिन अडीअडचणीची सोडवणूक करण्यासाठी शासन यंत्रणेची गरज नेहमीच असते. यातून ब्रिटिश शासनयंत्रणेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी ग्रामराज्याची कल्पना आली. क्रांतिकारकांनी स्थापन केलेले प्रतिसरकार हे आपले सरकार आहे असा विश्वास जनतेत निर्माण करण्यासाठी तिचे प्रश्न मार्गी लावले पाहिजेत, जनतेवर होणा-या अन्यायाचे परिमार्जन करून तिच्या संरक्षणाची हमी घेतली पाहिजे. तिला खराखुरा न्याय मिळवून दिला पाहिजे. जनतेची ही रास्त अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रति सरकारने विधायक कार्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली.[17]

त्यासाठी प्रतिसरकारने कार्यक्रमाची आखणी केली, तो कार्यक्रम स्वातंत्र्य सैनिक बाबुरावजी घोरपडे यांनी "चलेजाव आंदोलन" या पुस्तिकेत दिला आहे तो असा -

.1. जनतेची गा-हाणी ऐकूण त्यांची नोंद करणे व त्यांचा निकाल न्यायमंडळामार्फत देणे.

.2. स्थावर मिळकतीचा निकाल मात्र या न्याय मंडळाच्या अधिकार कक्षेखाली येत नव्हता.

.3. गावातील दोन पाटर्या मिटविणे.

.4. नवरा नांदवित नाही किंवा बायको नांदत नाही अशा प्रकारचे भांडणतंटे मिटविण्याचे काम करणे.

.5. न्याय मंडळा मार्फत वसूल केलेला पैसा (दंड) सार्वजनिक कामासाठी त्या त्या गावातील लोकांना परत करणे.

.6. लग्नासारख्या बाबतीत शेतकरी अनाठायी फार पैसे खर्च करतात व ते कर्जबाजारी होतात म्हणून अत्यंत कमी खर्चात सामुदायिक लग्नविधी करण्याची प्रथा घालून लोकांना काटकसरीची सवय लावण्याचा प्रयत्न करणे.

.7. लोकांत स्वराज्याची भावना जागृत करण्यासाठी स्वयंसेवक दल व कॉंग्रेस सेवादल यांची स्थापना करणे.

.8. तसेच "स्वतंत्र भारत" या नावाचे एक पत्रक काढून लोकांत क्रांतिपूरक अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करणे.

सदर पत्रकाच्या 5 ते 10 प्रती प्रत्येक गटाकडे पाठविल्या जात असत. या पाक्षिक पत्रकाचे संपादक विठ्ठलपंत कुलकर्णी होते. या पाक्षिकात प्रतिसरकारच्या कामाची माहिती व वैचारिक लेख असत.

अशा स्वरूपाचा जनताभिमुख व जनतेच्या कल्याणाचा कार्यक्रम प्रतिसरकारने हाती घेतला. भूमिगत कार्यकर्ते चारित्र्यसंपन्न होते. त्यामुळे खेडयातही घरात पुरुष मंडळी नसली तरी आयाबहिणी त्यांना आश्रय देत. प्रतिसरकारच्या स्थापनेमुळे या जिल्हयातील भूमिगतांचा दबदबा वाढला. प्रतिसरकारमध्ये तुफान सेना, आझाद सेना, गुप्त संघटना, शस्त्र संघटना होती. राष्ट्र सेवादलाचीही संघटना होती. सातारा जिल्हयाचे तीन विभाग करून, त्याचे वीस गट करण्यात आले. गटास एक गटनायक व त्यास एक सहाय्यक गटनायक देण्यात आला. प्रतिसरकारच्या वरिष्ठ मंडळात सभापती असत. या मंडळाच्या सभेत कार्यक्रमाची आखणी - कार्यकर्त्यांचा सहभाग, खर्चाचे हिशेब इ.संबंधी चर्चा होत असे. कार्यकारिणीमध्ये डिक्टेटर, गटनायक, पदाधिकारी होते. ही कार्यकारी गटवार फिरत असे. सामाजिक न्यायाची, समतेची, अन्याय निवारण्याची आणि विधायक स्वरूपाची प्रतिसरकारची कामगिरी नवसमाज रचनेचाच एक भाग होता. न्यायदानाबरोबरच जुन्या रूढी, अंधश्रध्दा दूर करून ग्रामसफाई, ग्रामशिक्षण, हुंडाबंदी, दारूबंदी यासारखी लोकोपयोगी कामे हातात घेवून प्रतिसरकारच्या धुरिणांनी आणि पाठिराख्यांनी अपूर्व व दैदिप्यमान इतिहास घडविला.[18]

जमिनीचे फेरवाटप करण्याचा प्रश्न प्रतिसत्तेच्या शासकीय मंडळाकडे आला. 1944 सालात शेकडो खेडयापर्यंत आपल्या प्रभावाचा कब्जा करण्यात यश मिळाले होते. प्रतिसरकारच्या शिस्तबध्द भूमिगत दल व तुफानी दलामार्फत गावोगावी असणारे गावगुंड, गुन्हेगार, वतनदार, दरोडेखोर यांच्याविरूध्द हत्यार उपसून त्यांचा बंदोबस्त करण्यात आला. वाळवा तालुक्यातील फरारी मंडळींना जी.डी.लाड व त्यांच्या सहका-यांनी स्वातंत्र्य चळवळीत आणण्याचा प्रयत्न केला.[19]

फेब्रुवारी 1945 पासून प्रतिसरकार हे ख-या अर्थाने "सरकार" या संज्ञेस पात्र झाले कारण आधुनिक शासनाची विधिमंडळ, कार्यकारिणी, न्याय मंडळे, संरक्षण दले, अर्थ व्यवस्था अशा प्रकारची वैशिष्टये प्रतिसरकारजवळ होती.[20]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रतिसरकारच्या निर्मितीत व यशात सातारा जिल्हयातील सर्व भूमिगत कार्यकर्त्यांचा सहभाग होता· तथापी प्रतिसरकारची कल्पना ख-या अर्थाने राबविली ती कुंडल गटानेच· इतर गटांतील कार्यकर्त्यांनी देखील त्या दृष्टीने जरूर प्रयत्न केले होते· पण ते प्रयत्न विस्कळीत व तुरळक स्वरूपाचे होते· तसेच त्यात शिस्त, संघटन व सातत्य यांचा अभाव होता· प्रतिसरकारच्या यंत्रणेचे नियमबध्द संघटन करून त्यास संस्थात्मक स्वरूप प्राप्त करून देण्याचे कार्य कुंडल गटच करू शकला म्हणूनच प्रतिसरकारच्या यशात कुंडल गट व त्याचे नेते नाना पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे·[21]

अशा पध्दतीने बळीराजा परिसरातील देशाला स्फूर्तिदायक व अभिमानास्पद असणारे तसेच ब्रिटिश सत्तेला कापरे भरविणा-या प्रतिसरकारची परंपरा व आदर्श असा इतिहास येथील श्रमिकांच्यासमोर आहे·

## 2·6 राजकीय पार्श्वभूमी :-

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्य लढयात सहभागी झालेल्या शेतकरी, शेतमजूर, दलित कामगार यांना आनंद झाला· या वर्गाने कॉंग्रेसच्या माध्यमाने स्वराज्याचे ध्येय प्राप्त करून घेतले· परंतु स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या कॉंग्रेसच्या ध्येय धोरणाने या वर्गाचा भ्रम निरास झाला· यातून कॉंग्रेसमधून डाव्या विचारांची बरीचसी मंडळी बाहेर पडली· महाराष्ट्रात उध्दवराव पाटील, नाना पाटील, दाजीबा देसाई, तुळशीदास जाधव, केशवराव जेधे, शंकरराव मोरे , भाऊसाहेब राऊत , दत्ता देशमुख या नेत्यांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून 13 जून 1948 रोजी "शेतकरी कामगार पक्षाची" स्थापना केली· कुंडल परिसरातील स्वातंत्र्य लढयातील नाना पाटलांचे बहुतांशी सहकारी शेतकरी कामगार पक्षात सामील झाले· शेतकरी पक्षाच्या स्थापनेमुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजात चैतन्याचे वारे पसरले·[22] बळीराजा परिसरातील बहुजन समाज शेतकरी कामगार पक्षाचे कार्य करू लागाला· त्यामुळेच सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्हयातील काही भागावर शे·का·पक्षाचे प्रभुत्व निर्माण झाले· शेतकरी, शेतमजूर, कामगार, दलित व दुर्बल घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी शे·का·पक्षाने सतत जागरूक राहून लोकशाही मार्गाने आंदोलने केली व राज्यकर्त्यांच्यावर सतत दबाव निर्माण केला· संयुक्त महाराष्ट्र आंदोलन व गोवामुक्ती आंदोलनातही या भागातील लोकांनी प्रत्यक्ष भाग घेतला· संयुक्त

महाराष्ट्र आंदोलनाच्या काळात 1957 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीत येथील जनतेने कॉंग्रेसचा दारूण पराभव केला· कॉंग्रेस पक्षाला पर्यायी पक्ष म्हणून शे·का·पक्ष काही वर्षे या परिसरात आपले अस्तित्व राखून होता· परंतु 1960 नंतरच्या बेरजेच्या राजकारण नीतीमुळे येथील विरोधी पक्षाचे अनेक नेतेमंडळी सत्ताधारी पक्षात डेरेदाखल झाली· तर काही मंडळींनी आपल्या वैयक्तिक स्वार्थापोटी शे·का·पक्ष व या परिसरातील डावी व पुरोगामी विचाराची चळवळ मोडीत काढण्याचा प्रयत्न केलेला आहे· आज शे·का·पक्ष आपले अस्तित्व या परिसरात टिकवून असला तरी तो मरणप्रायः अवस्थेत आहे·

अ· **खानापूर-आटपाडी विधानसभा मतदार संघ** :- बळीराजा धरण हे खानापूर-आटपाडी विधानसभा मतदार संघाच्या क्षेत्रात आहे· या मतदार संघावर सध्या कॉंग्रेसचा प्रभाव आहे· 1952 च्या विधानसभा निवडणूकीत खानापूर विधानसभा मतदार संघातून कॉंग्रेसचे के·दत्ताजीराव देशमुख (माहुलकर) निवडून गेले होते· संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर त्यांनी महाराष्ट्र विधान सभासदस्यत्वाचा प्रथम राजीनामा देवून या भागातील मतदारांचा स्वाभिमान जागृत ठेवून महाराष्ट्रीयन जनतेशी असलेली या परिसराची बांधिलकी स्पष्ट तर केलीच त्याचबरोबर महाराष्ट्राबाबत दिल्लीच्या कॉंग्रेस नेत्यांनी चालविलेल्या कूटनीतीला जोरदार चपराक दिली· 1957 च्या निवडणूकीत या मतदार संघातून संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार भाई भगवानराव मोरे (बप्पा) कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवाराचा पराभव करून विजयी झाले· या मतदार संघातील मतदारांनी समितीचा उमेदवार निवडून देवून कॉंग्रेसचे महाराष्ट्राच्या बाबतीत असलेल्या सूडाच्या धोरणाचा तीव्र निषेध नोंदविला· महाराष्ट्रात या निवडणूकीत कॉंग्रेसचा दारूण पराभव झाल्यामुळे केंद्र सरकारला 1 मे 1960 रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन करावा लागला व येथील जनतेच्या जागरूकतेमुळे त्यांना योग्य न्याय प्राप्त झाला· संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमुळे 1967 च्या निवडणुकीत कॉंग्रेसचे संपतराव माने विजयी झाले· 1972 च्या निवडणूकीत मात्र संपतराव मानेंना निसटता विजय मिळाला· या निवडणूकीत शे·का·पक्षाचे संपतराव पवार यांनी कॉंग्रेस उमेदवाराशी चिवट झुंज दिली व सत्ताधारी पक्षाच्या एकाधिकारशाहीला सुरूंग लावण्याचे काम येथील मतदारांनी केले· 1978 च्या निवडणुकीत कॉंग्रेसचे शहाजी गणपत पाटील व अपक्ष उमेदवार बाबासाहेब देशमुख यांच्यात अत्यंत चुरशीची निवडणूक होऊन कॉंग्रेसचे उमेदवार विजयी झाले· सन 1980 च्या निवडणूकी कॉंग्रेस (आय)

चे शहाजी पाटील व कॉंग्रेस §एस§ चे हणमंतराव पाटील यांच्यात अटीतटीची निवडणूक होऊन कॉंग्रेस एस चे हणमंतराव पाटील विजयी झाले. सन 1985 च्या निवडणूकीत कॉंग्रेस §आय§ चे संपतराव माने विजयी झाले. 1990 च्या निवडणूकीत कॉंग्रेस आये चे अनिल कलेजराव बाबर व कॉंग्रेसचे बंडखोर उमेदवार हणमंतराव पाटील यांच्यात लढत होऊन अनिल बाबर हे कॉंग्रेस §आय§ चे उमेदवार भरघोस मताने विजयी झाले. अशा पध्दतीने खानापूर-आटपाडी विधानसभा मतदार संघातील मतदारांनी 1957 व 1980 चा अपवाद वगळता कॉंग्रेसच्या बाजूने नेहमीच कौल दिलेला दिसतो. 1957 व 1972 च्या निवडणूकीत विरोधी पक्षाच्या उमेदवाराला भरघोस मते मिळालेली आहेत. परंतु नंतरच्या निवडणूकात मात्र विरोधी पक्षांची मोठया प्रमाणात हेळसांड झाल्याचे दिसते. डाव्या विचारांची परंपरा असलेल्या या परिसरात विरोधी पक्षांची आज जी दयनीय अवस्था दिसते. त्याला या पक्षातील नेत्यांचे आपापसातील मतभेद, हेवेदावे मोठया प्रमाणात कारणीभूत आहेत. तसेच या पक्षाच्या काही नेत्यांनी सत्ताधा-यांच्या बरोबर सत्ता प्राप्तीसाठी पडद्याआड केलेल्या तडजोडीही तितक्याच प्रमाणात कारणीभूत आहेत. प्रभावी पक्ष संघटनेचा अभाव व नेत्यांच्या तत्वनिष्ठेचा अभाव यामुळेही हा पक्ष येथे कमजोर बनला आहे. तसेच जिल्हा, राज्य व देशपातळीवरील कॉंग्रेस नेत्यांचा §कै.वसंतदादा, यशवंतराव चव्हाण, शरद पवार§ प्रभाव येथील मतदारांच्यावर मोठया प्रमाणात पडल्यामुळे विरोधी पक्षांची अवस्था आज चिंताजनक झालेली आहे.

ब. **खानापूर पंचायत समिती :-** खानापूर पंचायत समितीची स्थापना दि.1 मे, 1962 रोजी झाली. स्थापनेपासूनच आजअखेर ही पंचायत समिती कॉंग्रेस पक्षाच्या ताब्यात आहे. या पंचायत समितीमध्ये एकूण 26 सदस्य आहेत. पहिले सभापती म्हणून आटपाडीचे रस्तुतमराव उर्फ बाबासाहेब देशमुख यांची निवड झाली. सन 1965 मध्ये श्री.शहाजी गणपती पाटील हे सभापती झाले. खानापूर तालुक्याच्या राजकारणात कॉंग्रेस अंतर्गतच माहुलकरदादा व संपतराव माने यांचे प्रभावी दोन गट निर्माण झाले. ते एकमेकाना शह देण्याचा प्रयत्न करू लागले. यातूनच 1967 च्या पंचायत समितीच्या निवडणूकीनंतर पंचायत समिती माहुलकरदादा गटाच्या ताब्यात आली. या गटाचे श्री.विलासराव मोरे सभापती झाले. नंतर याच गटाचे श्री.गंगाराम बापू करांडे हे 1972 मध्ये सभापती झाले. 1979 मध्ये संपतराव देशमुख या तरूण कार्यकर्त्याकडे सभापतीपदाची सूत्रे आली.

परंतु कॉंग्रेसमधील अंतर्गत डावपेचामुळे त्यांना आपली पाच वर्षाची कारकीर्द पूर्ण करता आली नाही· 1982 मध्ये संपतराव माने गटाचे श्री·अनिलराव बाबर सभापती झाले· सन 1990 पर्यंत सभापती पदावर काम करीत असतानाच ते विधानसभेवर निवडून गेले· या निवडणूकीच्या काळातच अनिल बाबर व संपतराव माने यांच्यात वितुष्ट निर्माण होऊन तालुक्याच्या राजकारणात अनिल बाबर गट व संपतराव माने गट उदयाला आले· तत्पूर्वीच तालुक्याच्या पश्चिम भागात कॉंग्रेसतंर्गत आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवून असलेला डॉ·पतंगराव कदमांचा गट बाबर गटाला येवून मिळाला तर पश्चिम भागातील माजी सभापती संपतराव देशमुख व भाऊसाहेब यादव यांचा गट संपतराव माने गटाला मिळाला· अनिल बाबर यांची विधानसभेवर निवड झाल्यानंतर दि·4/4/90 रोजी सभापतीपदाची माळ त्यांनी मोहनराव श्रीपती कदम यांच्या गळ्यात घातली· 1992 च्या निवडणूकीत तालुक्याच्या पूर्वभागात बाबर गट विरुध्द किरण माने गट तर पश्चिम भागात कदम विरुध्द देशमुख गट अशी पंचायत समिती व जिल्हा परिषदेची अत्यंत चुरशीची निवडणूक झाली· या निवडणूकीत पश्चिम भागात देशमुख गटाला काही जागा थोडया मतांच्या फरकाने गमवाव्या लागल्या· संपतराव देशमुख गटाने "वसंत मंच"च्या नावाने निवडणूका लढविल्या होत्या· तालुक्याच्या उत्तर भागात वसंत मंचला नेत्रदीपक यश प्राप्त झाले· तरी संपूर्ण तालुक्यात अनिल बाबर व मोहनराव कदम गटाला बहुमत प्राप्त झाले व मोहनराव कदम यांची दि·14/3/92 रोजी सभापतीपदावर फेरनिवड झाली·

**क· बलवडी व तांदुळवाडी ग्रामपंचायत :-** स्वातंत्र्यप्राप्ती नंतर ग्रामीण भागातील लोकांना सत्तेत सहभाग करून घेण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले· त्यानुसार खेडयात ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या· बलवडी येथे सन 1955 मध्ये ग्रामपंचायतीची स्थापना केली आहे· या ग्रामपंचायतीमध्ये एकूण 11 सदस्य आहेत· सध्या जाधवनगर स्वतंत्र ग्रामपंचायत झाल्याने एकूण 9 सदस्य आहेत· बलवडीची ग्रामपंचायत 1967 सालापर्यंत शे·का·पक्षाच्या ताब्यात होती· परंतु 1967 च्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाने विजय मिळवून ग्रामपंचायत आपल्या ताब्यात घेतली· 1972 च्या निवडणूकीत येथील मतदारांनी ग्रामपंचायतीच्या सत्तेतून कॉंग्रेसला बाजूला सारून परत शे·का· पक्षाला विजय मिळवून देवून ग्रामपंचायतीची सत्ता प्राप्त करून दिली· राजकीय दृष्टया जागरूक असलेल्या येथील मतदारांनी 1972 च्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाला विजयी केले· परंतु

सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाने आपल्या नीतीप्रमाणेच गलिच्छ राजकारण सुरू केले. त्यामुळे विकासाची कामे तर झालीच नाहीत उलट गावात प्रबल गट निर्माण होऊन सत्ताधा-यांनी विरोधी पक्षाला संपविण्यासाठी दडपशाही, दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यातून मारामारीसारख्या घटना घडू लागल्या. विरोधकांना नेस्तनाबून करण्यासाठी कूटनीतीचा व वाममार्गाचा वापर सत्ताधा-यांनी सुरू केला. पुरोगामी विचारांची परंपरा असलेल्या या गावात प्रत्यक्षात मात्र स्थानिक राजकीय क्षेत्रात पप्पू कलानी-हितेंद्र ठाकूर प्रवृत्तीच्या मंडळींनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यांच्या दडपशाही व एकाधिकारशाहीचा प्रभाव गावातील काही समाज घटकांच्यावर आढळतो. शासनाविरूध्द "आसूडा"चा वापर करणारे, फुले, शाहू महाराज, नाना पाटलांचे वारसदार म्हणून सांगणारे येथील स्थानिक कार्यकर्ते अशा दुष्प्रवृत्तीचा बिमोड करण्याऐवजी त्यांना खतपाणी देण्याचा प्रयत्न करतात.

बलवडी ग्रामपंचायतीच्या अलिकडील 1983 व 1992 च्या दोन निवडणूका येथील जनतेने बिनाविरोध केल्या आहेत. 1992 साली गावातील वृध्दांनी व प्रस्थापितांनी युवकांच्या हातात ग्रामपंचायतीची सूत्रे सुपुर्द केलेली आहेत. सध्याच्या ग्रामपंचायतीमध्ये महिला, मागासवर्गीय व बहुजन समाजाला प्रतिनिधित्व देवून मंडल आयोगाच्या शिफारशीची अंमल बजावणी राजकीय सत्तेत करण्याचा प्रयत्न येथील जनतेने केला आहे.

तांदुळवाडी गावामध्ये सन 1959 मध्ये ग्रामपंचायतीची स्थापना केली असून या ग्रामपंचायतीमध्ये एकूण सात (7) सदस्य आहेत. प्रथम काही वर्षे ही ग्रामपंचायत शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात होती. परंतु अलिकडच्या काळात कॉंग्रेस पक्षाने ती आपल्या ताब्यात घेतली आहे. या गावातही दोन प्रबळ राजकीय गट असून सत्ता स्पर्धेत ते एकमेकांना शह, काटशह देण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात.

बलवडी येथे शेतक-यांना शेतीसाठी कर्जपुरवठा व इतर सहाय्य करण्यासाठी सन 1930 मध्ये सर्व सेवा सहकारी सोसायटीची स्थापना केली आहे. या सोसायटीचे एकूण 9 संचालक आहेत. स्थापनेपासून 1992 पर्यंत सोसायटीची सत्ता शेतकरी कामगार पक्षाने उपभोगली आहे. 1992 च्या निवडणूकी श्रीराम पॅनेल व सिध्देश्वर पॅनेल यांच्यात चुरशीची निवडणूक झाली. या निवडणूकीत श्रीराम पॅनेलला भरघोस यश प्राप्त होऊन

विरोधी पॅनेलचा दारूण पराभव झाल्याने चेअरमन पदाच्या निवडणूकीत सत्ता प्राप्ती साठी गलिच्छ राजकारण व कूटनीतीचा वापर करून प्रस्थापित मंडळींनी परत सोसायटीत आपले वर्चस्व निर्माण केले. परंतु प्रभावी विरोधी पक्षाच्या जागरूकतेमुळे एक वर्षातच सदरची सोसायटी शासनाने प्रशासकाच्या ताब्यात दिलेली आहे.

## xxx संदर्भ xxx


1· मुक्ती संघर्ष चळवळ : खानापूर तालुक्यातील मजूर - कष्टकरी शेतक-यांच्या दुष्काळ विरोधी पर्यायाचा आसूड, विटा 1985, पृ·2 व 3·

2· *Thukral E.G. and Sakate M.D., 'Baliraja : A perople's Alternative', Big Dams - Displace People, New Delhi, 1992, P.144.*

3· खानापूर पंचायत समिती विटा येथून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार·

4· स्थलनिर्देशक §टोपोशिट§ न·बॉम्बे 47के/8 च्या आधारे·

5· कोळी एस·वी·गावकामगार तलाठी बलवडी-तांदुळवाडी यांच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे·

6· कुंभार एस·व्ही·ग्रामसेवक ग्रामपंचायत बलवडी, यांच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे·

7· मुक्ती संघर्ष चळवळ, उ·नि·, पृ·10

8· तत्रैव, पृ·10

9· गोफणे वी·एन·, बळीराजा स्मृती धरण §संशोधन प्रकल्प§ लोकसंख्या शिक्षण मंडळ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, 1990, पृ·10

10· सहस्त्रबुध्दे चिंतामणी, "बलवडीचे क्रांती स्मृतीवन" दै·सकाळ कोल्हापूर, वर्धापन दिन विशेषांक 1 ऑगस्ट 1993·

11· पाटील विलास "क्रांतिसिंह नाना पाटील" क्रांतिसिंह विश्वस्त मंडळ हणमंतवाडिये §सांगली§, प्रथम वर्ष 1986, पृ·98

12· ठोके मो·नि·, "श्रमिकांचा कैवारी" पारस प्रकाशन बेळगाव, 1983 पृ·96

13· तत्रैव, मलपृष्ठ

14· शिंदे आबासाहेब, "सातारचे प्रति सरकार, प्रसंग आणि व्यक्ती" उषा प्रकाशन कोल्हापूर 1987, मुखपृष्ठाच्या आतील पान·

15· पाटील विलास, उ·नि·, पृ·103 व 105

16· पाटणे संभाजीराव, "सातारचे प्रति सरकार, प्रसंग आणि व्यक्ती" उषा प्रकाशन, कोल्हापूर 1987, मुखपृष्ठाच्या आतील पान·

17· पाटील विलास, उ·नि·, पृ·119

18· पाटणे संभाजीराव उ·नि·पृ·63, 64 व 65·

19· लाड जी·डी· "पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य" भारती विद्यापीठ प्रकाशन पुणे, 1986, पृ·134

20· शिंदे आबासाहेब, उ·नि·पृ·11

21· पाटील विलास, उ·नि·पृ·124

22· तत्रैव, पृ·137·

12420
A